# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५६६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०५/०९/२०१६

१) अज्ञात चोराने मोटार सायकल चोंरून नेल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक 30/08/2016 रोजी 13.00 वा. दर. यातील फिर्यादी ने आपली मोसा क्र. एमएच 31 सीसी 9573 किंमती 15000/- रु. ची बाजार समीती गोडाऊन जवळ ठेवुन बाजारात गेला व बाजार करून काही वेळाने परत आले असता मोटार सायकल दिसुन आली नाही तीचा शोध घेतला परंतु मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने मोटार सायकल चोरुन नेल्याने दि.04/09/2016 ला पो.स्टे लाखांदुर ला फिर्यादी भोजराम मोहन बारई वय 42 वर्ष रा. खैरना यांचे लेखी तक्रार रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम 379 भांदवि. अन्वय गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. तलमले पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

२) अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोद. :–

दिनांक 03/09/2016 रोजी 16.00 वा. ते 18.30 वा. दर. यातील फिर्यादीची पीडीत अल्पवयीन मुलगी ही आपले घरी खेळत असतांना यातील विधीसंघर्षग्रस्त बालकाने पिडीत मुलीस 1 रु देवुन खावु खाण्यासाठी चाल असे म्हणुन तिला आपले घरी नेऊन जबरीने संभोग केला असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम 376,(2)(आय) भांदवि. सहकलम 3,(1)(4) लैंगीक अत्याचार बालकांचे संरक्षण अधि.2012 अन्वय गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. लाकडे पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

३) डॉक्टरचा निष्काळजीपणामुळे महीलेचा मृत्यु. :–

दिनांक 29/08/2016 रोजी 10.30 वा. ते 22.00 वा. दर. पोस्टे तुमसर येथे मर्ग क्र. 20/16 कलम 174 जाफौ मधील मृतक सौ जयश्री राजेश ठवकर वय 28 वर्ष रा. खापा हिला प्रसुती करीता दि. 29/8/2016 चे सकाळी 1030 वा. तिचे पती व नातेवाईक यानी सु.बो. शासकीय दवाखाना तुमसर. येथे औषधोपचारा करीता भरती केले असता दवाखाण्यातील शासकिय सोनोग्राफी मशीन बंद असुन रक्त तपासनारे कर्मचारी हजर नसल्याचे कारण आरोपी वैद्यकीय अधिकारी यांनी सांगुन मृतकचे पतीला बाहेरुन मृतकची सोनोग्राफी व रक्त तपासनी करुन आणन्याचे सांगीतल्या वरुन मृतकचे पतीने खाजगी डॉ. गायनॉलाजीस्ट सौ. मिनाक्षी मल्लेवार तुमसर यांचे नर्सींगहोम मधुन सोनोग्राफी केले असता मृतकचे गर्भाशयात बाळ मरन पावल्याचा सोनोग्राफी रिपोर्ट दिला. आरोपी डॉ. ने पाहुण ही मृतकचे वेळीच प्रसुती उपचार करण्यास निष्काळजीपना, दुर्लक्ष केल्यामुळे 22.10 वा. मृतक मृत्युमुखी पडल्याने या प्रकरणी जिल्हाशल्य चिकीत्सक यांचे प्राथमीक चौकशी अहवाला व सरतर्फे फिर्यादी पोउपनी. जाधव यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम 304(अ) भांदवि. अन्वय गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. उईके पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

४) इसमाचा उपचारा दरम्यान मृत्यु . :—

दिनांक ०२/०९/०१६ रोजी २०.३० वा. दर. यातील मृतक शामराव काशीराम रामटेके वय ५० वर्ष, रा. मांगली हा आपल्या घराचे स्लॅप वरुन लाकळी सिडीने तांदळाची चुंगडी खाली उतरवित असतांना सिडी वरुन पाय घसरुन खाली पडल्याने त्यास उपचारा करीता ग्रा. रु. पवनी येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी नितेश शामराव रामटेके वय २६ वर्ष, रा. मांगली यांचे तोंडी व डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

५) वडीलांनी मुलीचा गळा दाबुन मारल्याचा संशयावरून गुन्हा नोंद. :—

दिनांक ०१/०९/०१६ रोजी ००.३० ते ०८.४५ वा. दर. यातील फिर्यादीची मृतक मुलगी कु. परीधा डाकराम घोडमारे वय १.५ वर्ष, हीला तीचे वडील डाकराम पंढरी घोडमारे वय ३० वर्ष, रा. गोसे बु. यांनी गळा दाबल्यामुळे मुलगी मरण पावल्याने तीचे प्रेत जमीनीत पुरविले असले बाबत संशय व्यक्त करुन आज रोजी फिर्यादी सौ. मनिषा डाकराम घोडमारे वय ३५ वर्ष, रा. गोसे यांनी दि. ०३/०९/२०१६ ला पो. स्टे. ला येवुन तोंडी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी सपोनि. नेवारे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

प्रभारी पोलीस अधिकारी भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.